**नि.फौ.ख.क्र. १३२/२०२१**
**सरकार –वि– बाबाजी दिवटे**
**निशाणी क्र. ५४ खाली**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ तपासीअंमलदार रमेश सखाराम आवारे यांचा शपथेवर उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. व्ही. ए. व्यवहारे यांच्यातर्फे सुरु**

१. मी वडनेर भैरव पो.स्टेशनला सन २०१८ ते सन २०२५ पर्यंत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की सदर गुन्ह्याच्या तपासासाठी मला वरिष्ठांचे लेखी आदेश नव्हते. घटनास्थळाचा ७/१२ उतारा किंवा ८–अ चा उतारा मी हस्तगत केला नाही तसेच ते दोषारोप पत्रासोबत दाखल केले नाहीत. पंचांना पंचनाम्यासाठी मी लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की पंचांच्या पंचनाम्यावर मी फिर्यादीच्या सांगण्यानुसार सह्या घेतल्या. प्रस्तुतप्रकरणात जे पंच आहेत त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच स्थानिक आहेत किंवा कसे याची मी वैयक्तिक शहानिशा केली नाही. ते पंच कोणत्या गावचे होते हे आता माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील दोन्ही पंच फिर्यादीचे नातेवाईक होते.

२. हे म्हणणे खरे आहे की तपासादरम्यान मी कोणतेही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की सदर प्रकरणातील सर्व साक्षीदार फिर्यादीचे नातेवाईक असून त्यांचे जबाब मी फिर्यादीच्या सांगण्यानुसार नोंदवलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नसतांना फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आरोपींविरुद्ध

खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा सांगितलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.19 13:24:42 +0530

**दि. १९.११.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**